
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 0 AUG 2025
सकाळ

# काळसेकर काव्य पुरस्काराचे गवळी, डिसोजा मानकरी

अरुणचंद्र गवळी फेलिक्स डिसोजा

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठातर्फे प्रख्यात कवी सतीश काळसेकर व ऋत्विज काळसेकर यांच्या वाङ्मयीन कार्याच्या स्मरणार्थ दिला जाणारा यंदाचा काळसेकर काव्य पुरस्कार सुप्रसिद्ध कवी अरुणचंद्र गवळी व फेलिक्स डिसोजा यांना जाहीर झाला. सप्टेंबर २०२५च्या दुसऱ्या आठवड्यात पुरस्कारांचे वितरण केले जाईल. विद्यापीठातील मराठी अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी त्याबाबतची माहिती दिली.

गवळी यांना सतीश काळसेकर पुरस्कार देण्यात येणार असून, एकवीस हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. त्यांच्या 'अरुणचंद्र गवळीच्या कविता' संग्रहातून मौलिक स्वरूपाची काव्यविषयक जाणीव प्रकट झाली आहे. मराठीतील मान्यवर नियतकालिकांमधून त्यांच्या कविता प्रकाशित झाल्या आहेत. त्यांच्या कवितेत ठळक सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय भान व्यक्त झाले आहे. वसईतील श्री. डिसोजा यांना ऋत्विज काळसेकर पुरस्कार देण्यात येईल. दहा हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह असे त्याचे स्वरूप आहे. डिसोजा यांनी 'नोंदीनांदी' व 'आरशात ऐकू येणारं प्रेम' संग्रहातून लक्षणीय स्वरूपाचे काव्यलेखन केले आहे. याआधी ज्येष्ठ कवी वसंत आबाजी डहाके, नारायण कुलकर्णी-कवठेकर व अनुराधा पाटील यांना सतीश काळसेकर काव्य पुरस्काराने, तर दिशा पिंकी शेख, वर्जेश सोळंकी, वीरधवल परब यांना ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्काराने गौरविले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 AUG 2025
तरुण भारत

# गवळी, डिसोजा यांना काळसेकर काव्य पुरस्कार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने कवी सतीश काळसेकर आणि ऋत्विज काळसेकर यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा यंदाचा काव्य पुरस्कार अरुणचंद्र गवळी, फेलिक्स डिसोजा यांना जाहीर झाला आहे. डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, मराठीतील काव्यलेखन कामगिरीसाठी दिला जाणारा 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' अरुणचंद्र गवळी यांना जाहीर झाला आहे. २१ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. नव्या पिढीतील आश्वासक काव्यलेखनासाठी दिला जाणारा ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार कवी फेलिक्स डिसोजा यांना जाहीर झाला आहे. १० हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. सतीश काळसेकर यांच्या कुटुंबियाकडून दिलेल्या देणगीमधून विद्यापीठाच्यावतीने हे पुरस्कार देण्यात येतात. पुरस्काराचे चौथे वर्ष आहे. सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात विद्यापीठाच्यावतीने हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.





अरुणचंद्र गवळी, फेलिक्स डिसोजा

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 AUG 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचे काळसेकर काव्य पुरस्कार अरुणचंद्र गवळी, फेलिक्स डिसोजा यांना जाहीर





अरुणचंद्र गवळी फेलिक्स डिसोजा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कवी सतीश काळसेकर आणि ऋत्विज काळसेकर यांच्या वाङ्मयीन कार्याच्या स्मरणार्थ प्रदान करण्यात येणारे २०२५ साठीचे काव्य पुरस्कार कवी अरुणचंद्र गवळी आणि कवी फेलिक्स डिसोजा यांना जाहीर करण्यात आले आहेत.

मराठीतील लक्षणीय कवीच्या एकंदर काव्यलेखन कामगिरीसाठी दिला जाणारा 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' अरुणचंद्र गवळी यांना जाहीर झाला आहे. २१ हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. अरुणचंद्र गवळी मराठीतील महत्त्वाचे कवी आहेत. त्यांच्या 'अरुणचंद्र गवळीच्या कविता' या संग्रहातून मौलिक स्वरुपाची काव्यविषयक जाणीव प्रकट झाली आहे. नव्या पिढीतील आश्वासक काव्यलेखनासाठी दिला जाणारा 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार २०२५' कवी फेलिक्स डिसोजा (वसई) यांना देण्यात येणार आहे. १० हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. फेलिक्स डिसोजा यांनी 'नोंदीनांदी' आणि 'आरशात ऐकू येणारं प्रेम' या संग्रहातून अतिशय लक्षणीय स्वरुपाचे काव्यलेखन केले आहे. सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

महा न्यूज & व्ह्यूज

2 0 AUG 2025


वामाक्षी
Mob.- 9175089609

# अरूणचंद्र गवळी, फेलिक्स डिसोजा यांना विद्यापीठाचे काळसेकर काव्य पुरस्कार जाहीर

**कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज ):**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने प्रख्यात कवी सतीश काळसेकर आणि ऋत्विज काळसेकर यांच्या वाङ्मयीन कार्याच्या स्मरणार्थ प्रदान करण्यात येणारे सन २०२५ साठीचे काव्य पुरस्कार सुप्रसिद्ध कवी अरुणचंद्र गवळी आणि कवी फेलिक्स डिसोजा यांना जाहीर करण्यात आले आहेत.

विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मराठीतील लक्षणीय कवीच्या एकंदर काव्यलेखन कामगिरीसाठी दिला जाणारा सतीश काळसेकर काव्य पुरस्कार अरुणचंद्र गवळी यांना जाहीर झाला आहे. एकवीस हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. अरुणचंद्र गवळी हे मराठीतील एक महत्त्वाचे कवी आहेत. त्यांच्या अरुणचंद्र गवळीच्या कविता या संग्रहातून मौलिक



स्वरूपाची काव्यविषयक जाणिव प्रकट झाली आहे. मराठीतील मान्यवर नियतकालिकांमधून त्यांच्या कविता प्रकाशित झाल्या असून त्यांच्या कवितेतून ठळक असे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय भान व्यक्त झाले आहे.

नव्या पिढीतील आश्वासक काव्यलेखनासाठी दिला जाणारा ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार २०२५' कवी फेलिक्स डिसोजा (वसई) यांना देण्यात येणार आहे. दहा हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. फेलिक्स डिसोजा यांनी 'नोंदीनांदी' आणि 'आरशात ऐकू येणारं प्रेम' या संग्रहातून अतिशय लक्षणीय स्वरूपाचे काव्यलेखन केलेले आहे.

सतीश काळसेकर यांच्या कुटुंबियाकडून देण्यात येणाऱ्या देणगीमधून शिवाजी विद्यापीठाच्या वतीने हे पुरस्कार देण्यात येतात. यंदा पुरस्काराचे चौथे वर्ष असून यापूर्वी ज्येष्ठ कवी वसंत आबाजी डहाके, नारायण कुलकर्णी कवठेकर आणि अनुराधा पाटील यांना 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कारा'ने तसेच दिशा पिंकी शेख, वर्जेश सोळंकी व वीरधवल परब यांना ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले आहे. सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात शिवाजी विद्यापीठाच्या वतीने हे पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार आहेत.

2 0 AUG 2025
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रोजगार निर्मिती अभ्यासक्रम बनवा

■ राज्यसभेचे माजी खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांचे आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिक्षण संस्थांनी नवीन शैक्षणिक धोरणाकडे संधी म्हणून पाहिले पाहिजे. तसेच रोजगार निर्मित अभ्यासक्रम तयार केले पाहिजेत, असे आवाहन राज्यसभेचे माजी खासदार डॉ. विनय सहस्त्रबुध्दे यांनी केले.

विद्यापीठ विकास मंचच्या वतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. एका हॉटेलमधील



या व्याख्यानाप्रसंगी मंचचे प्रदेश अध्यक्ष एन. डी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. सहस्त्रबुध्दे म्हणाले, शिक्षण संस्थांनी शिक्षणाचे रोल मॉडेल तयार केले पाहिजे. नवीन शैक्षणिक धोरणात अनेक नवनवीन संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

चॉईस बेस्ड क्रेडीट सिस्टिममध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा. जेणेकरून विद्यार्थी याकडे आकर्षित होतील. शिक्षण पूर्ण होताच विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी मिळाल्या पाहिजेत. त्यासाठी शिक्षण संस्थांनी सर्वच क्षेत्रातील कंपन्यांबरोबर सामंजस्य करार करून चांगले संबंध प्रस्थापित करावेत. विद्यार्थ्यांनी कॉलेजकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे.

नवीन शैक्षणिक धोरणाची संधी घेऊन शैक्षणिक क्षेत्रात नवीन उपक्रम शिक्षण संस्थानी राबवावेत. यावेळी विद्यापीठ विकास मंचचे अमित कुलकर्णी, विनीता तेलंग, स्वागत परूळेकर, संजय परमणे, रतन कांबळे, श्रीनिवास गायकवाड, सिध्दार्थ शिंदे आदी उपस्थित होते.

महा न्यूज & व्ह्यूज

20 AUG 2025

वामाक्षी

Mob.: 9175089609

# विद्यापीठात राष्ट्रीय फौंड्री दिनानिमित्त प्रशांत बोरा यांचे गुरूवारी व्याख्यान

कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज ):

७६ व्या राष्ट्रीय फौंड्री दिनाच्या निमित्ताने पुणे येथील बोरा मल्टिकॉर्पचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत बोरा यांचे विशेष व्याख्यान शिवाजी विद्यापीठात येत्या गुरूवारी (दि. २१) आयोजित करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठ आणि दि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ फौंड्रीमन या संस्थेचे कोल्हापूर चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यान आयोजिले आहे.



विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात गुरूवारी ४ वाजता प्रशांत बोरा यांचे 'स्केलिंग बियाँड कम्फर्ट झोन्स' या विषयावर व्याख्यान होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील असतील. या व्याख्यानास फौंड्री उद्योगाशी निगडित सर्व घटकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठ-उद्योग साहचर्य केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, समन्वयक डॉ. सुभाष माने, फौंडेशनचे अध्यक्ष राहुल पाटील, उपाध्यक्ष सतीश कडूकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 AUG 2025

पुढारी

# राष्ट्रीय फौंड्री दिनानिमित्त विद्यापीठात उद्या व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात गुरुवारी (दि. २१) ७६ व्या राष्ट्रीय फौंड्री दिनाच्या निमित्ताने पुणे येथील बोरा मल्टिकॉर्पचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत बोरा यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

दि इंडियन इन्स्टिटयूट ऑफ फौंड्रीमन संस्थेचे कोल्हापूर चॅप्टर व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यान होणार आहे. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात दुपारी चार वाजता बोरा यांचे 'स्केलिंग बियाँड कम्फर्ट झोन्स' या विषयावर व्याख्यान होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील असणार आहेत. व्याख्यानास उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठ-उद्योग साहचर्य केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, समन्वयक डॉ. सुभाष माने, फाऊंडेशनचे अध्यक्ष राहुल पाटील, उपाध्यक्ष सतीश कडूकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 AUG 2025
पुढारी

# प्रा. जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार कार्यक्रम तात्पुरता स्थगित

**कोल्हापूर :** प्रा. डॉ. जे. एफ. पाटील मेमोरिअल पुरस्काराचा बुधवार, दि. २० रोजी होणारा कार्यक्रम तांत्रिक कारणास्तव पुढे ढकलण्यात आला आहे. विद्यापीठाच्या वतीने प्रा. डॉ. जे. एफ. पाटील मेमोरिअल पुरस्कार ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांना प्रदान करण्यात येणार होता. परंतु, काही कारणास्तव हा कार्यक्रम तात्पुरता स्थगित केला आहे. कार्यक्रमाची नवीन तारीख विद्यापीठ प्रशासनाकडून लवकरच कळविण्यात येईल, असे विद्यापीठाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

20 AUG 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



डॉ. डी. एन. शिंदे



# शिक्षण ते संशोधन; सर्वांगीण विकास



## विद्यापीठामुळे नवी ओळख

2 0 AUG 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



क्रांतिकारी शोध

डॉ. पी.एन. शिंदे

# रेडिओ..!



@gmail.com